| | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | २२/१२/२०२५ |
| | नोंदणी दिनांक | : | २२/१२/२०२५ |
| | निकाल दिनांक | : | १८/०३/२०२६ |
| | निकाल कालावधी | : | वर्षे महिने दिवस<br>०० ०२ २४ |

**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, हदगांव यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी– श्रीमती एस.एस. लोहकरे–जाधव)**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४९२/२०२५** **निशाणी क्र.१**

०१. पार्वतीबाई भ्र पांडुरंग पवार, वय – ७५ वर्षे, धंदा–घरकाम,
रा. शिवपुरी ता. हदगांव जि. नांदेड

०२. अर्चना भ्र संजय राणे, वय – ५० वर्षे, धंदा–घरकाम,
रा. दिघडी ता. उमरखेड जि. यवतमाळ

०३. आनंदराव पि पांडुरंग पवार, वय – ४७ वर्षे, धंदा–शेती,

०४. दिलीप पि पांडुरंग पवार, वय – ४५ वर्षे, धंदा–शेती,
दोघे रा. शिवपुरी ता. हदगांव जि. नांदेड **अर्जदार .....**

**विरुध्द**

कोणीही नाही. **गैरअर्जदार...**

**अर्ज : मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम ३ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी.**

**१.** अर्जदार क्र १ ते ४ यांनी कै. पांडुरंग जयराम पवार यांचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**अर्जदारांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे**

**२.** मयत कै. पांडुरंग जयराम पवार यांची अर्जदार क्रं. १ ही पत्नी आहे व अर्जदार क्र २ ही मुलगी आहे व अर्जदार क्र ३ व ४ ही मुले आहेत.

**३.** अर्जदार क्रं. १ हिचे पती कै. पांडुरंग जयराम पवार हे दिनांक ०७/११/२०२४ रोजी मौजे शिवपुरी ता. हदगाव जि. नांदेड येथे मयत झाले आहे. तसेच मयत कै. पांडुरंग जयराम पवार यांची आई रंगुबाई ही सुध्दा मयत झाली आहे.

अर्जदार क्रं. १ ते ४ यांना मयत कै. पांडुरंग जयराम पवार यांचे वारस म्हणुन वारस प्रमाणपत्र शासकिय व निमशासकीय कामाकरीता गरजेचे आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ यांचे व्यतिरीक्त कै. पांडुरंग जयराम पवार यांना अन्य कोणीही वारस नव्हते व नाहीत. म्हणून अर्जदार क्रं. १ ते ४ यांनी मयत कै. पांडुरंग जयराम पवार यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी हा अर्ज दाखल केलेला आहे.

**४.** तदनंतर, प्रस्तुत अर्जात अर्जदार क्रं. १ ते ४ यांनी दैनिक ''दलितवाणी'',या वृत्तपत्रात दिनांक ०९/०१/२०२६ रोजी जाहीर प्रगटन दिले. जाहीर प्रगटन देवून देखील प्रस्तुत प्रकरणात हजर राहून अर्जास कुणीही हरकत घेतलेली नाही. अर्जदारांच्या कथनांचा विचार करता खालील प्रश्न माझे विचारार्थ निघाले असून, त्या प्रश्नांवरील उत्तरे कारणांसहित खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| **१.** | अर्जदार क्र १ ते ४ हे मयत कै. पांडुरंग जयराम पवार यांचे मृत्यूनंतर कायदेशीर वारस आहेत का ? | होय. |
| **२.** | अर्जदार क्र १ ते ४ हे वारस प्रमाणपत्र मिळणेस पात्र आहेत काय ? | होय. |
| **३.** | आदेश काय ? | अंतिम आदेशानुसार |

## कारणमिमांसा

## प्रश्न क्रमांक १ व २ करिता

**५.** अर्जदार क्रं. १ ते ४ यांनी त्यांची केस सिध्द करण्यासाठी अर्जदार क्रं. ४ चे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्रमांक ११ वर दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी अर्जात नमूद केलेल्या सर्व बाबी तपशीलवार नमूद केलेल्या आहेत. तसेच ''दैनिक दलितवाणी'', वृत्तपत्रात प्रसिध्द केलेली जाहीर नोटीस दिनांक ०९/०१/२०२६ रोजीची, मयत कै. पांडुरंग जयराम पवार यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. तसेच अर्जदार क्र १ ते ४ यांच्या आधार कार्डच्या प्रमाणित प्रती दाखल केल्या आहेत. तसेच मयत कै. पांडुरंग जयराम पवार यांच्या आईच्या मृत्युची नोंद

उपलब्ध नसल्याचे प्रमाणपत्र दाखल केले आहे.

६. अर्जदार क्र १ ते ४ यांनी दिनांक ०९/०१/२०२६ रोजी ''दैनिक दलितवाणी'' या वृत्तपत्रामध्ये जाहीर प्रगटन देवून देखील प्रस्तुत अर्जास कुणीही आक्षेप घेतला नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणात कुणीही हजर न राहिल्याने अर्जदार क्रं. ४ यांची साक्ष अबाधित राहिली. तसेच अर्जदार क्रं. ४ यांनी साक्षी दरम्यान त्यांना शासकिय व निमशासकीय कामाकरीता वारसदार म्हणुन नोंद करण्याकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयत कै. पांडुरंग जयराम पवार यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळण्यास ते पात्र आहेत. त्यामुळे प्रश्न क्रमांक १ व २ चे उत्तर मी होकारार्थी देऊन, खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करीत आहे.

| **आ दे श** |
|---|
| १. अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. अर्जदार क्रं. १ ते ४ यांना मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम ३ नुसार मयत कै.पांडुरंग जयराम पवार यांचे वारस असल्याचे एकत्रित वारस प्रमाणपत्र विहीत न्याय शुल्क स्वीकारुन घेवुन देण्यात यावे. |
| ३. खर्चाबाबत आदेश नाही. |

JADHAV SWATI GANPAT
Digitally signed by JADHAV SWATI GANPAT
Date: 2026.03.20 13:49:12 +0530

(श्रीमती एस. एस. लोहकरे-जाधव)
सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,हदगाव,
ता.हदगाव, जि.नांदेड.

ठिकाणः हदगांव
दिनांकः १८/०३/२०२६

 **दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४९२/२०२५**

**MHND160020212025**

# प्रमाणपत्र

मी अशी खात्री देतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील सर्व मजकुर मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे / आदेशाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत.

कनिष्ठ लिपीकाचे नाव - ओ.बी.पत्रे
न्यायालयाचे नाव - सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी वर्ग - १, हदगांव.

आदेश दिनांक :१८.०३.२०२६
पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली तारीख :१८.०३.२०२६
आदेश / न्यायनिर्णय अपलोड केलेली तारीख :२०.०३.२०२६